महाराष्ट्र पोलीस

पुणे पोलीस

सत्यमेव जयते

## प्रेस नोट

ता. २२/०८/२०१९

**पि.एम.पि.एम.एल बस प्रवासामध्ये जेष्ठ महिलांचे दागिने, पैसे चोरणाऱ्या टोळीस गुन्हे शाखा, युनिट २ कडून अटक, १४ गुन्हे उकडकीस.**

पुणे शहर व परीसरात पि.एम.पि.एम.एल. बस प्रवासामध्ये जेष्ठ व महीलांचे गळयातील दागिने, हातातील पाटल्या व पर्स मधिल दागिने चोरीस जाण्याचे प्रकार घडत असल्याने सदर गुन्हेगारांवर पाळत ठेवून, त्यांचा शोध घेवुन त्यांचेवर कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठांनी गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांना दिले होते, त्यांनतर गुन्हे शाखा युनिट -२ चे अधिकारी व कर्मचारी यांनी बसमध्ये स्वतः प्रवास करुन सदर टोळ्या हेरण्यास व त्यांचा शोध घेण्यास सुरवात केली.

सदर आदेशाप्रमाणे कारवाई करीत असताना गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी गजानन पवार यांना मिळालेल्या माहीतीवरुन पुणे स्टेशन पि.एम.पि.एम.एल. बस स्टॉप वरुन बस मध्ये चढण्याचे तयारीत असलेले टोळीला गुन्हे शाखा,युनिट २ चे टिमने ताब्यात घेतले व त्यांचेकडे तपास करता त्यांनी पुणे स्टेशन, स्वारगेट, शिवाजीनगर अशा गर्दी असलेल्या बस स्टॉपकडे येणाऱ्या लॉगरुटच्या बसेस मध्ये चढुन सदर बस मधील जेष्ठ किंवा एकट्या महिला अथवा इसमांना हेरुन टोळीने त्यास घेरुन गर्दीचा फायदा घेवन गळ्यातील दागिने, हातातील पाटल्या आणि पर्समधिल पैसे व दागिने चोरी केल्याचे सदर टोळीतील इसमांनी कबुल केलेने त्यांचेकडुन तपासदरम्यान बंडगार्डन, स्वारगेट, शिवाजीनगर, वानवडी या पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या एकुण १४ गुन्ह्याची उकल गुन्हे शाखेने केली असुन **तपासदरम्यान ४,०६,६००/- रुपये किमतीचे १०७ ग्रॅम वजानाचे सोन्याचे दागिने व ३० हजार रुपये रोख रक्कम असा एकुण ४,३६,६००/-रु चा मुद्देमाल आरोपींकडुन जप्त करण्यात आली आहे.** सदर टोळीमधील १)कृष्णा ऊर्फ आण्णा पोपटराव गव्हाणे वय २४ वर्षे रा. केसनंद फाटा काळयाचा वाडा, काळे कॉम्प्लेक्स, शेवटची खोली बी.जी.एस. कॉलेज मागे सातव हाऊस वाघोली पुणे. २)आकाश ऊर्फ आक्या शिवाजी अहिवळे वय २० वर्षे रा. सुरज कॉम्प्लेक्स, १६ नंबर धनकवडी पुणे ३) मंगेश ऊर्फ मंग्या सुरेश उकरंडे वय १८ वर्षे रा. केसनंद गांव बाबाजी वस्ती वाघोली पुणे. ४) सुरज किशोर सोनवणे वय २१ वर्षे रा. खराडेपाटील बुवा नगर, खराडी पुणे. ५)हुकुमसिंग राजसिंग भाटी, वय ४७ वर्षे रा. रक्षकनगर फेज २, ९/४०१ खराडी पुणे (माल घेणारा) या इसमांना अटक करण्यात आली असुन सुरज सोनावणे हा या टोळीचा प्रमुख आहे.सदर आरोपींवर पुर्वी देखिल अशाच प्रकारचे गुन्हे केल्याने गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपींनी आणखीन पि.एम.पि.एम.एल बसमध्ये चोरीचे गुन्हे केल्याचे सांगितले असून सदर तपास गुन्हे शाखा, युनिट २ करीत आहे.

तसेच सहकारनगर पो.स्टे. गुरनं. ४४०/२०१९, भादवि क. ३८० या गुन्हयाचा युनिट २ कडून तपास सुरु असताना युनिट २ कडील पोना अतुल गायकवाड व पोशि अजित फरांदे यांना मिळालेल्या माहितीवरुन आरोपी नामे छोटया उर्फ आकाश अरुण कांबळे, वय २३ रा. गल्ली नं. ७६, तळजाई वसाहत, धनकवडी पुणे यास अटक करुन तपास केला असता त्याचेकडून **एकूण १,४९,२००/- रुपये किमतीचा मुद्देमाल त्यात २४ ग्रॅम सोन्याचे दागिने, १ डेल कंपनीचा लॅपटॉप, एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल व ३३०००/- रोख असा ऐवज जप्त करण्यात आलेला आहे.** सदर आरोपीकडून १ घरफोडी व ३ चोरीचे असे एकूण ४ गुन्हे उघड करण्यात आले आहेत. सदर आरोपीवर पूर्वीचे घर फोडी, मोटारसायकलचोरी व चोरीचे असे १८ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री बच्चन सिंग, सहा पोलीस आयुक्त, डॉ शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक गजानन पवार, सपोनि जयवंत जाधव, पोउपनि नितिन शिंदे, पोलीस कर्मचारी संजय दळवी, यशवंत आंब्रे, अनिल ऊसुलकर, शेखर कोळी, दिनेश गडांकुश, अस्लम पठाण, विनायक जाधव, अतुल गायकवाड, चेतन गोरे, विशाल भिलारे, उत्तम तारु, विवेक जाधव, स्वप्निल कांबळे, कादीर शेख, अजित फरांदे, मितेश चोरमले व गोपाळ मदने यांनी केलेली आहे.

(गजानन पवार)
पोलीस निरीक्षक
युनिट २, गुन्हे शाखा, पुणे शहर


पुणे शहर पोलीस आयुक्तालय